पान १ वरून

आत्मनिर्भरतेच्या भावनेने देश ओतप्रोत - मोदी

बुद्धिमत्तेबाबत भाष्य करताना मोदींनी, लवकरच मी एका भाषेत भाषण करत असताना जनता त्याक्षणी ते भाषण त्यांच्या आपल्या भाषेत ऐकू शकेल, असे सांगितले. 'आरआरआर' चित्रपटातील नाटू नाटू गाणे आणि 'द एलिफंट व्हिस्पर्स' लघुपटाला मिळालेल्या ऑस्कर पुरस्कारांचाही मोदींनी उल्लेख केला. सरत्या वर्षातील अखेरच्या 'मन की बात'चा समारोप करताना पंतप्रधानांनी देशवासीयांना नववर्षाच्या शुभेच्या दिल्या.

राज्याला नवा डीजीपी कोण मिळणार ?

मुंबई सीपीपदी संधी मिळण्याची शक्यता कमी मानली जाते.

राज्याचे पोलीस महासंचालक (डीजीपी) रजनीश सेठ यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने रविवार, ३१ डिसेंबर रोजी ते सेवानिवृत्त झाले. शनिवार, रविवारची शासकीय सुट्टी लक्षात घेता सेठ यांना शुक्रवारीच (ता.२९) राज्य पोलीस दलाच्या वतीने निरोप देण्यात आला. मुंबईतील नायगाव येथील पोलीस मैदानावर त्यांना मानवंदना देण्यात आली. राज्य सरकारने सेठ यांची यापूर्वीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी वर्णी लावली आहे. सेठ यांच्यानंतर पोलीस महासंचालकपदासाठी मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर आणि केंद्रात प्रतिनियुक्तीवर असलेल्या रश्मी शुक्ला यांची नावे चर्चेत होती. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील पोलीस अधिकारी असलेल्या शुक्ला यांची सेवाज्येष्ठतेनुसार डीजीपीपदी वर्णी लागेल, असे सांगितले जात होते. मात्र, शुक्ला यांनीच राज्याचे पोलीस प्रमुखपद घेण्यास नकार दिल्याने राज्य सरकारने तातडीने मुंबई सीपी फणसाळकर यांच्याकडे डीजीपीपदाची अतिरिक्त जबाबदारी सोपवावी लागली.

रश्मी शुक्ला जून २०२४ मध्ये सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे पोलीस महासंचालकपदावरून माघार घेतलेल्या शुक्ला यांची मुंबई पोलीस आयुक्तपदी वर्णी लागते का? हे पाहणे उत्सुकतेचे राहील. २०२४ मध्ये लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक होणे अपेक्षित आहे. त्यानंतर फेब्रुवारी २०२५ मध्ये मुंबई महापालिकेसह राज्यातील विविध महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे डीजीपीसह मुंबई पोलीस आयुक्तपदी सत्ताधाऱ्यांना खमके अधिकारी हवे आहेत. राज्य गुप्तचर विभागाच्या प्रमुख असताना विरोधी पक्षातील नेत्यांचे फोन कॉल्स बेकायदेशीरपणे रेकॉर्ड केल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता. काँग्रेस नेते नाना पटोले, शिवसेना खासदार संजय राऊत, भाजप नेते एकनाथ खडसे यांचे फोन रेकॉर्ड करण्यात आले होते. कोर्टाच्या आदेशानंतर पुणे आणि मुंबईत शुक्ला यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला होता.

दरम्यान, राज्यात सतांतर झाल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारने शुक्ला यांना 'क्लीन चिट' दिली असली तरी विरोधी पक्षातील एका बड्या नेत्यांकडे जाऊन शुक्ला यांनी संबंधित प्रकरणाची माहिती यापूर्वीच दिली होती. पतीचे निधन झाल्याने व सध्या केंद्रात प्रतिनियुक्तीवर असलेल्या शुक्ला पुन्हा वादात अडकू इच्छित नसल्याचे बोलले जाते. त्यामुळे त्या महाराष्ट्रात परतण्याची शक्यता कमी असल्याचे पोलीस दलातील सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे आगामी काळात विवेक फणसाळकर यांच्याकडे डीजीपीपद देऊन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दुसरे विश्वासू अधिकारी व मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त असलेल्या देवेन भारती यांना मुंबईचे पोलीस आयुक्तपद मिळू शकते. मात्र, त्यासाठी भारती यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ग्रीन सिग्नल मिळवावा लागेल.

नितीन करीर राज्याचे नवे मुख्य सचिव

मात्र, केंद्राने राज्याचा प्रस्ताव नामंजूर केला. त्यामुळे करीर आणि सुजाता सौनिक यांच्यापैकी कोणाला संधी मिळणार याची उत्सुकता होती. वरिष्ठता लक्षात घेता गृहविभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची वर्णी लागणार होती. मात्र, सौनिक जून २०२५ मध्ये निवृत्त होणार असल्याने त्यांना करीर यांच्यानंतर संधी देता येईल, हे लक्षात घेऊन महाराष्ट्राचे सुपुत्र असलेल्या करीर यांना मुख्य सचिवपदाची संधी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला. आगामी काळात लोकसभा व विधानसभा निवडणुका लक्षात घेता करीर यांनाच संधी द्यावी, यासाठी अनेक मंत्र्यांचा आग्रह होता. खासकरून शिंदे गटाने करीर यांचे नाव लावून धरले होते. त्यामुळे मनोज सौनिक यांना मुदतवाढ देण्यास केंद्राने नकार देताच करीर यांची वर्णी लावण्याचा निर्णय घेण्यात आला.

सन २०२४ मध्ये मार्च-एप्रिल महिन्यात लोकसभा आणि त्यानंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये विधानसभा निवडणुका अपेक्षित आहेत. निवडणुकांच्या कालावधीत विद्यमान मुख्य सचिवांना मुदतवाढ देण्याचा प्रघात आहे. २०१९ मध्ये मुख्य सचिव अजोय मेहता यांना लोकसभा व त्यापाठोपाठ झालेल्या विधानसभा निवडणुकीपर्यंत सहा महिन्यांहून अधिक कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. त्यामुळे करीर यांनाही एप्रिल ते ऑक्टोबर २०२४ या कालखंडात मुदतवाढ मिळू शकते. तशी मुदतवाढ मिळाल्यास करीर यांना किमान १० महिन्यांचा कालावधी मिळू शकतो. त्यानंतर सुजाता सौनिक यांना नोव्हेंबर २०२४ ते जून २०२५ अशी ८ महिन्यांसाठी मुख्य सचिवपदाची संधी दिली जाऊ शकते. सौनिक यांना तशी संधी मिळाल्यास त्या राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव ठरतील. सुजाता सौनिक या रविवारी निवृत्त झालेले मनोज सैनिक यांच्या पत्नी आहेत. सुजाता सौनिक जर राज्याच्या मुख्य सचिव झाल्या तर राज्याचे मुख्य सचिवपद भूषवलेले सौनिक पती-पत्नी हे पहिले दाम्पत्य ठरेल.

चौकट : कार्यतत्पर सनदी अधिकारी म्हणून करीरांची ओळख

अहमदनगर जिल्ह्यातील डॉ. नितीन करीर यांची एक प्रामाणिक व कार्यतत्पर सनदी अधिकारी म्हणून ओळख राहिली आहे. डॉ. करीर यांनी एमबीबीएस पदवी घेतली. त्यांची १९८८ मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झाली. सध्या वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत असलेल्या करीर यांनी महसूल, वने तसेच नगर विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून काम पाहिले आहे. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व पुढे सांगली, पुणे जिल्हाधिकारी म्हणून काम केले. माहिती व जनसंपर्क महासंचालक, नोंदणी महानिरीक्षक, पुणे महापालिकेचे आयुक्त, पुणे विभागीय आयुक्त अशा विविध पदांची जबाबदारी सांभाळली आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, विक्रीकर आयुक्त, जमाबंदी आयुक्त या पदावरही काम केले आहे.

वाळूजमध्ये अग्नितांडव

(पान १ वरून) पठाण (रा. बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर) यांची सनशाइन इंटरप्रायजेस नावाची कंपनी आहे. येथे लेदरचे हातमोजे बनवले जातात. यासाठी मो. असमुद्दिन शेख (रा. बिहार) हे ठेकेदार आहेत. ठेकेदारासह त्यांची पत्नी इसमत परवीन शेख, मुलगा मोहम्मद मुजमीन शेख, मुलगी आयेशा शेख यांच्यासह एकूण १७ कामगार काम करत होते. हे सर्व कामगार बिहार राज्यातील असून कुटुंबासह कंपनीतच राहत होते. शनिवारी काम आटोपून जेवण झाल्यानंतर ते झोपी गेले. दरम्यान, रविवारी पहाटे साडेबाराच्या सुमारास कंपनीस भीषण आग लागली. यावेळी हे सर्वजण गाढ झोपेत होते. आग लागताच सर्वत्र धुराचे लोट उठल्याने त्याची धग व चटके त्यांना बसल्याने काही कामगार झोपेतून उठून बाहेर पळाले. पाहता पाहता ही आग चौफेर भडकल्याने सहा कामगार यात अडकले. सोबत एक पाळीव श्वानही होता. हे सर्वजण बाहेर पडण्यासाठी जीवाच्या आकांताने सैरावैरा पळत होते. मात्र बाहेर पडण्याचा मार्गच बंद झाल्याने त्यांना येता आले नाही. सुमारे तीन तास अडकून पडलेले हे कामगार आगीच्या लपेटात येताच अक्षरशः खाक झाले.

सहा बंबांनी केले शर्थीचे प्रयत्न

दरम्यान, आगीची घटना कळताच वाळूज अग्निशमन दलाचे दोन बंब, बजाजचा १, मनपाचा २ व चिकलठाणा अग्निशमन दलाचा एक अशा एकूण सहा बंबांसह वाळूज एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. दरम्यान, १०८ क्रमांकाच्या ४ रुग्णवाहिका आल्या. एक बाजू वगळता सर्व बाजूंनी बंदिस्त असलेल्या या कंपनीतील आग जास्तच भडकल्याने अथक परिश्रम करून अग्निशमन दलाच्या जवानांनी नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले. तरीही आग सुरूच होती. प्रथम आतमध्ये अडकून पडलेल्या सहा कामगारांचे मृतदेह अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले. एक कुत्राही या आगीत होरपळून मृत्युमुखी पडला. सर्व मयत कामगारांचे मृतदेह घाटी दवाखान्यात रवाना करण्यात आले.

सहा कामगार मृत्युमुखी

दरम्यान, या आगीत मो. मुस्ताक मो इब्राहीम (६२), कौशर आलम जफीरुद्दीन (३७), मो. एक्बाल मो. एहरार (१७), मो. मार्गब आलम सहाबुद्दीन (३२, हे सर्व रा. ग्राम डलौखर, ता.मिर्झापूर, जि. मधुबनी, बिहार), रियाज बशीर सय्यद (२५, रा. रोशनगाव, ता.बदनापूर, जि. जालना) व रामलाल रामविलास सिंदरिया (४६, रा. ग्रामयोगाभिगा, ता. मांडील, जि. जहानाबाद, बिहार) असे एकूण ६ कामगार आगीत होरपळून ते मृत्युमुखी पडले.

९ कामगार बालंबाल बचावले

बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग बंद झाल्याने कंपनीच्या गेट व झाडावरून खाली उड्या मारल्याने मो. इरशाद जफरोद्दीन आलम (२८), मो. हैदर अब्दुल हय शेख (२९), मो. दिनारूल मो एहरार (२०), मो. अफरोज मु. शोएब (२३), दिलीपकुमार चंद्रिका मंडल (२४, सर्व रा. चांदपूर, ता देवरी, जि. गया, बिहार), सुभाषिश हरादन हलदार (३५, रा. ग्रामनलगोरा, ता. सोनटीकारी, जि.कुलतली, पश्चिम बंगाल) स्वतः ठेकेदार, मो. हसनोद्दीन शेख (रा. ग्रामडलौखर, ता मिर्झापूर, जि. मधुबनी, बिहार) याची पत्नी इस्मतहजा (३२) व पाच वर्षांची मुलगी व दीड वर्षांचा मुलगा हे थोडक्यात बचावले. यात १४ पुरुष एक महिला व दोन लहान मुले अशा एकूण १७ जणांचा समावेश आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वाळूज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अविनाश आघाव, गौतम पातारे, गणेश ताठे, सपोनि. गौतम वावळे, पोउनि. दीपक रोठे सह पोलीस कर्मचारी व डॉ. सुशील राऊत, पायलट मंगल राठोड, जिकठाण प्राथमिक आरोग्य केंद्र व डॉ. अनंत पाटील, पायलट मुसा शेख, भेंडाळा प्राथमिक आरोग्य केंद्र व डॉ. विशाल आगळे, पायलट नितीन लांडगे, बन्सीलालनगर येथील रुग्णवाहिकेचे डॉ. काळे, चंदन राजपूत व सिल्क मिल्ल व डॉ. हर्षल कोठारी, फहीम खान हे रुग्णवाहिकेसह घटनास्थळी दाखल झाले. या डॉक्टर आणि पायलटने शर्तीचे प्रयत्न करत जखमींना घाटीत दाखल केले.

शेजारच्या कंपनी कामगाराची धावपळ

ज्या सनशाईन कंपनीला आग लागली, त्या कंपनीशेजारी असलेल्या हीना इंडस्ट्रिजचा कामगार गंगाधर कदम याने ही आग प्रथम पाहिली. त्यामुळे त्यांनी धावपळ करत अडकून पडलेल्या कामगारांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. तसेच थेट अग्निशमन दलाचे कार्यालय गाठून त्यांना सोबत घेत घटनास्थळी आणून कामगारांना वाचवण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, आगीची घटना कळताच सकाळी पालकमंत्री संदीपान भुमरे, विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, पोलीस आयुक्त मनोज लोहिया, विभागीय आयुक्त मधुकर आर्दड, पोलीसउपायुक्त नितीन बगाटे, सहाय्यक पोलीसआयुक्त महेंद्र देशमुख यांनी भेटी दिल्या.

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक राहुल निर्वळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कंपनी मालक व ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना ताब्यात घेतले असून अधिक तपास पोनि. गणेश ताटे करत आहेत.

स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियान राज्यभर राबवणार

(पान १ वरून) यावे. या अभियानात लोकांना सहभागी करून घेण्यात यावे. मुंबई शहरात सुरू केलेल्या या अभियानात शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध प्रतिष्ठान सहभागी होत आहेत. यामुळे या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप येत आहे. मुंबई डीप क्लीन ड्राईव्हचे एक मॉडेल तयार झाले आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. विकास प्रकल्पामुळे तोडाव्या लागलेल्या झाडांचे पुनर्रोपण करणार आहे. मुंबईत रिकाम्या जागेवर झाडे लावली जाणार आहेत. मुंबई शहरात अर्बन फॉरेस्ट संकल्पना राबवण्यासाठी विचार सुरू आहे. ठाणे शहरातील कोपरी परिसरापासून गायमुखपर्यंत ग्रीन पॅच तयार केला जात आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुंबई शहरातील स्वच्छता कर्मचारी खरा हीरो आहे. कारण, ते सकाळी लवकर उठून कामाला सुरुवात करतात. मुंबई स्वच्छ ठेवतात. या कर्मचाऱ्यांच्या वसाहती स्वच्छ ठेवण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. सफाई कर्मचारी यांना विमा सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. सफाई कर्मचारी यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. मुंबई शहरात राबवले जाणारे स्वच्छता अभियान आता राज्यात सर्वत्र नेले जाणार आहे. हे अभियान आपल्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबवा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध लोकप्रतिनिधींना केले. मुख्यमंत्री शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आमदार विद्या ठाकूर, आशिष शेलार, यामिनी जाधव, भारती लव्हेकर, प्रकाश सुर्वे, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, कालिदास कोळंबकर यांच्याशी संवाद साधला. तत्पूर्वी महापालिका आयुक्त आय. एस. चहल यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी मुंबई शहरात राबवल्या जात असलेल्या डीप क्लीन ड्राईव्हबाबत माहिती दिली. यावेळी स्वच्छता कर्मचारी संदीप पवार, शीला जाधव, मच्छिंद्र सावंत, स्वप्नील शिरवाळे, अर्चना मोरे यांचा सत्कार करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त सुधाकर शिंदे यांनी आभार मानले. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वच्छता कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. स्वच्छता कामात उपयोगी ठरणाऱ्या वाहनांच्या संचलनास हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी वीर माता जिजाबाई भोसले उद्यान, सदानंद धवन उद्यान, भोईवाडा येथे भेट देऊन सफाई कर्मचारी व मुलांशी संवाद साधला.

कित्तूरकर कॉलेजमध्ये क्रीडा महोत्सव

गडहिंग्लज : येथील विद्या प्रसारक मंडळाच्या रावसाहेबआण्णा कित्तूरकर ज्युनि. कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सवाला सुरुवात झाली. उदय पुजारी यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवाचे उदडघाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सहसचिव गजेंद्र बंदी होते. अनिता चौगुले यांनी स्वागत केले.

यावेळी उदय पुजारी, गजेंद्र बंदी यांनी मनोगत व्यक्त केले. दयानंद ग्वाडी यांनी क्रीडा प्रतिज्ञा दिली.

कोडोली अर्बन बँकेत सत्तारूढ गटाची बाजी

पन्हाळा : प्रतिनिधी

पन्हाळा तालुक्यातील कोडोली येथील दि. कोडोली अर्बन को-ऑप बँकेच्या १७ जागांसाठी लागलेल्या पंचवार्षिक निवडणुकीत गोकुळ संचालक अमरसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखालील श्री राजर्षी शाहू सत्तारूढ आघाडीने सुरवातीलाच तीन जागा बिनविरोध करत सर्व चौदा जागा मताधिक्याने जिंकल्या.

रविवारी पन्हाळा येथील मोरोपंत ग्रंथालय सभागृहात झालेल्या मतमोजणीचा निकाल पन्हाळा सहाय्यक निबंधक तथा निवडणूक निर्णय अधिकारी नारायण परजणे यांनी जाहीर केला. सत्तारुढ गटातून बाजूला झालेले व सलग पंधरा वर्षे चेअरमन पद भूषवलेले राजेंद्र उर्फ आबासो हिंदुराव पाटील व त्यांचा पुतण्या अभिजित संभाजी पाटील यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

विजयी उमेदवार व कंसात त्यांना पडलेली मते : चौगले रघुनाथ बापू (४७२९), जद सुभाष विलास (४७३९), जाधव सचिन पांडुरंग (४७३९), आबासो केशव पाटील (४७१४), उदयसिंग शिवाजीराव पाटील (४७५८), जयंत प्रदीप पाटील (४७९२), प्रकाश गणपती पाटील (४७५७), राहुल प्रकाश पाटील (४७७६), श्रीपती बाबुराव पाटील (४६४७), बाळासो सर्जेराव माने (४६४७), रमेश दत्तात्रय मेणकर (४६६९), नितीन शिवाजीराव हुजरे (४५८१), लक्ष्मी रंगराव चौगले (४८४०), मनीषा फत्तेसिंह पाटील (४८८१). बिनविरोध उमेदवार दिलीप अण्णाप्पा गायकवाड, विवेक विश्वास जाधव, मनोहर बळवंत पाटील.

इचलकरंजी जनता बँकेची 'नव वर्षारंभ ठेव योजना'

रांगोळी : इचलकरंजी येथील पश्चिम महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील अग्रगण्य मल्टीस्टेट शेड्युल्ड कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या वतीने नवीन वर्षाच्या शुभारंभाला ८.१५ व्याजदराची नववर्षारंभ ठेव योजना जाहीर करुन आपल्या ग्राहकांना नववर्षाची भेट दिली असल्याची माहिती बँकेचे चेअरमन स्वप्नील आवाडे यांनी दिली.

एक वर्षाच्या कालावधीकरिता अल्प मुदतीत गुंतवणूक करर्णायासाठी ही ठेव योजना खूपच उपयुक्त आहे. त्या योजनेसाठी कमीत कमी गुंतवणूक एक हजार राहील, सदरची योजना ४६१ दिवसाच्या कालावधीची असून, यामध्ये वैयक्तीक, सहकारी संस्था, ट्रस्ट, कंपनी, भागीदारी फर्म यांच्यासाठी ठेवीवर व्याज दर ८.१५ टक्के इतका राहील, जो प्रत्यक्षात इफेक्टिव्हली ८.४० टक्के इतका पडेल. तर ज्येष्ठ नागरिकांसाठी ८.४० टक्के इतका व्याजदर असून तो इफेक्टिव्हली ८.६७ टक्के इतका पडेल. या ठेव योजनेचा कालावधी १ जानेवारी २०२४ ते २९ फेब्रुवारी २०२४ अखेर अगर त्या अगोदर किंवा अपेक्षित रक्कम जमा झाल्यानंतर बंद करण्यात येईल. सदरची ठेव योजना ग्राहकासाठी खूपच लाभदायक असून, सर्व ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन चेअरमन स्वप्नील आवाडे यांनी केले.सदरप्रसंगी बँकेचे व्हा. चेअरमन संजयकुमार अनिगोळ, संचालक व बीओएम चेअरमन सी. ए. चंद्रकांत चौगुले, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शिरगावे, जनरल मॅनेजर किरण पाटील व दीपक पाटील तसेच बँकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

घरा घरात... मना मनात...
पुण्य नगरी
जाहीर प्रगटन
आता फक्त 600/- रुपयांत
- संपर्क -
मो. 8888836822
वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल.

संजय शिरगावे यांना विशेष गौरव पुरस्कार

रांगोळी : इचलकरंजी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी मल्टिस्टेट शेड्युल्ड बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शिरगावे यांना बँकींग क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल २०२३ सालचा 'विशेष गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हुपरी येथील श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक आणि लोकसेवक आ. बा. नाईक सार्वजनिक विश्वस्त निधी, हुपरी यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार क्षेत्रात विशेष कामगिरी बजावणाऱ्या नामवंतांना विविध पुरस्कार देवून गौरविण्यात आले. पालकमंत्री हसन मुश्रीफ, आमदार प्रकाश आवाडे, आमदार राजूबाबा आवळे, अध्यक्ष आण्णासो भोजे, कार्यकारी संचालक शिवराज नाईक यांच्या हस्ते संजय शिरगांवे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गडहिंग्लजमध्ये ६ पासून संजीवनी कृषी प्रदर्शन

गडहिंग्लज : संजीवनी महिला कृषी विकास व बहुउद्देशीय संस्था, किसान ॲग्रीकल्चरल ॲण्ड इंडस्ट्रियल एक्झिबीशन सोसायटी, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, गडहिंग्लज नगरपालिका आणि राज इव्हेंट कोल्हापूर यांच्यावतीने राज्यस्तरीय संजीवनी कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.येथील सौ. वि. दि. शिंदे हायस्कूलच्या शेजारील खुल्या जागेत शनिवार (दि. ६) ते मंगळवार (दि. ९) सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत हे प्रदर्शन खुले राहणार आहे. प्रदर्शनात ट्रॅक्टर, शेतीसाठी लागणारी अवजारे, बि-बियाणे, खते व जंतूनाशके, जलसिंजनाच्या पध्दती, टिश्युकल्चर, कृषी व्यवस्थापक शेती अर्थ पुरवठा, बँकिंग इन्शुरन्स, मार्केटिंग व्यवस्थापन, रोपवाटिका (नर्सरी), पाणी व्यवस्थापन, शासकीय व विना शासकीय संस्था संघटना व शासकीय एजन्सीज, दुग्ध व्यवसाय, अपारंपारिक ऊर्जा, मत्स्योत्पादन, रेशीम उद्योग याचबरोबर अन्न प्रक्रिया व साठवणूक, पॅकेजिंग पध्दती, महाराष्ट्र शासन कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत कृषी महाविद्यालय कोल्हापूर आदी विषयी प्रात्यक्षीक व माहिती मिळणार आहे. या प्रदर्शनात शेतीत नवनवीन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी शेतमालाची पिक स्पर्धा आयोजित केली आहे.

ICICI Home Finance | कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी - कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९, भारत

शाखा कार्यालय : १ ला मजला, कार्यालय क्र. २३,२४, २५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र - २९, उप भूखंड क्र.१, राधिका रोड, कारंजे तर्फ, सातारा - ४१५ ००२

नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सीक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सिअल ॲसेट्स आणि इन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सीक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई-लिलाव विक्रीकरिता सूचना.

याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत. तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रतीकात्मक ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री " जसे आहे जिथे आहे ", " जसे आहे जे आहे तत्त्वानुसार " आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार / सह कर्जदार / हमीदार / कायदेशीर वारसदार यांची नावे आणि कर्जखाते क्रमांक	संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास	येणे असलेली रक्कम	राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहणीची तारीख, वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
ए	बी	सी	डी	इ	एफ	जी
१.	विष्णू मारुती कोळी (कर्जदार), मीनल विष्णू कोळी (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएसआरए ०००००१२६६०८२	फ्लॅट क्र. ४०४, ४ था मजला, ए विंग, गुरू पुष्प अपार्टमेंट, प्लॉट क्र. ४४ ते ४७, सर्व्हे क्र. १९४/१ए/१, कोंढवे मेढा रोड, सातारा, महाराष्ट्र -४१५ ००२.	रु. १६,२२,२९०/- दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. १२,०५,६८५/- / रु. १,२०,५७०/-	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
२.	संजय कोंडिबा साळुंखे (कर्जदार), विद्या संजय साळुंखे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएसआरए ०००००१२६७९८२ व एनएचएसआरए ०००००१२६७९८४	फ्लॅट क्र. एफओ ४, सावकार कॉम्प्लेक्स, ४ था मजला, सीटीएस क्र. ५४ ए, चिमणपुरा पेठ, सातारा, महाराष्ट्र, सातारा -४१५ ००२.	रु. १२,३०,७२४/- दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. ८,५४,०२४/- / रु. ८५,४१०/-	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
३.	अमित अशोक कदम (कर्जदार), मंगला अशोक कदम (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएसआरए ०००००१२९५९०८	फ्लॅट क्र. एफ ३ नीलम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, मंगळवार पेठ, सातारा, ता. व जि. सातारा, समर्थ मंदिराजवळ, सी. एस. नं. ४१३/ए / १, सातारा - ४१५ ००२.	रु. २१,६६,७१४/- दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. १६,७८,९५०/- / रु. १,६७,९००/-	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
४.	रूपाली शिंदे (कर्जदार), भरत शिंदे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएसआरए ०००००१३६२७४५ व एलएचएसआरए ०००००१३६२७४६	शिवसाई अपार्टमेंट, शॉप नं एलजी १०, तळमजला, प्रतापगंज पेठ, सातारा, ता. व जि. सातारा, राधिका थिएटरच्या समोर, सी. एस. नं. १६७, सातारा, महाराष्ट्र.	रु. १८,८५,२८५/- दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. १६,५५,१९५/- / रु. १,६५,५२०/-	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
५	संदीप महादेव दिघे (कर्जदार), वैशाली संदीप दिघे (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीयूएन ०००००१३२१५३२	प्लॉट क्र. ७ व ८, गट क्र. १५३/१, मनोरथ नगरी, मौजे खेड बुद्रुक, ता. खंडाळा, जि. सातारा, महाराष्ट्र - ४१५ ००२.	रु. ४६,१७,७४०/- दि. १५ डिसेंबर, २०२३	रु. १५,७९,५००/- / रु. १,५७,९५०/-	०८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१९ जानेवारी, २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोबल टेक** यांचे संकेतस्थळ (**यूआरएल लिंक** - https://BestAuctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार/सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क दिनांक **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ५. ००** पर्यंत अदा करावे. त्यास्तव ही शेवटची संधी आहे, अन्यथा संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात येणार आहे.

प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / डिमांड ड्राफ्ट डीडी यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, १ ला मजला, कार्यालय क्र. २३,२४,२५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र - २९, उप भूखंड क्र. १, राधिका रोड, कारंजे तर्फ, सातारा - ४१५ ००२** येथे **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार आणि वेळेत आपली बोली सादर करु शकणार नसतील, तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, १ ला मजला, कार्यालय क्र. २३,२४,२५, सातारा सिटी बिझनेस सेंटर, सर्व्हे क्र. २८३/१, ए, अंतिम भूखंड क्र - २९, उप भूखंड क्र. १, राधिका रोड, कारंजे तर्फ, सातारा - ४१५ ००२** येथे **१८ जानेवारी, २०२४** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात डीडी हा राष्ट्रीयीकृत / शेड्युल बँकेचा आणि " **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड- लिलाव** " यांच्या नावे आणि **सातारा